शुक्रवार, १६ जानेवारी २०१५

SEVEN MANTRAS

सकाळ सातारा TODAY

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

## दिल्ली संचलनासाठी इंगवले याची निवड



सातारा, ता. १५ : नवी दिल्ली येथे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या प्रमुख उपस्थितीत यंदा होणाऱ्या प्रजासत्ताक दिन कार्यक्रमातील मुख्य संचलनासाठी कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील प्रथम वर्ष 'एनसीसी'चा कॅडेट विपुल दिलीप इंगवले (भोसे) याची निवड झाली आहे. सातारा जिल्ह्यातून सिनिअर डिव्हिजनचा तो एकमेव कॅडेट ठरला आहे. त्याला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, २२ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कर्नल एस. के. पांडे, महाविद्यालयाचे एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट बी. डी. भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.